CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com    lakshamaha.dhule@gmail.com    lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २८२ वा ▶ सोमवार दि. ७ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## अमित शहा यांना भेटल्याचे वृत्त खोटे : जयंत पाटील



**मुंबई ।** मी काल शरद पवारांसोबत होतो आणि पुढेही राहणार माझ्याकडून पक्ष वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. मी अमित शहांना भेटलो या बद्दल तुम्ही संशोधन करा, घरी बसून बातम्या केल्या गेल्याचा टोलाही शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लगावला आहे. माझी अमित शहा यांच्यासोबत काहीच चर्चा झाली नाही. बातम्या पेरणारे तुम्ही असा टोला मिडीयाला लगावला आहे. असा गैरसमज पसरवणे चुकीचे आहे, बातमी देणाऱ्यांनी अभ्यास करुन बातमी द्यायला हवी, असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे.

## न्यूज कॉलम

### वृद्धेच्या सोनपाटल्या प्रवासात लांबविल्या

**साक्री ।** शहरातील मध्यवर्ती बसस्थानक ते देवपूरमधील अभियंतानगर प्रवासादरम्यान चोरट्याने वृद्धेच्या लाखाच्या सोन्याच्या पाटल्या लंपास केल्या. गुन्हा दाखल झाला. चोरीची ही घटना शुक्रवारी (ता. ४) दुपारी दीड ते दोनदरम्यान घडली. याबाबत शांताबाई युवराज पाटील (रा. गोंदूर, ता. धुळे) यांनी पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला.

### आजाराला कंटाळून एकाची आत्महत्या

**धुळे ।** आजाराला कंटाळून एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कदाणे (ता. शिंदखेडा) येथे घडली. राजेंद्र शांतीलाल चव्हाण (वय ४९, रा. कदाणे) असे मृताचे नाव आहे. त्यांनी शुक्रवारी (ता. ४) घरात छताच्या लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. त्यांना शिंदखेडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. याबाबत शिंदखेडा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

# शाहांचं महाराष्ट्रावर विशेष प्रेम

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतीपादन

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात केंद्रीय सहकार संस्था निबंधकांनी विकसित केलेल्या संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. केंद्रीय सहकार संस्था निबंधक कार्यालयाने सहकारातून समृद्धी संकल्पनेअंतर्गत संकेतस्थळ विकसित केले आहे. शाह यांच्या हस्ते दुपारी या संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासह इतर मंत्री आणि नेते उपस्थित होते. यावेळी बोलताना अजित पवार यांनी अमित शाह यांचं कौतूक केलं. अजित पवार यांनी अमित शाह यांचं महाराष्ट्रावर अधिक प्रेम असल्याचं सांगितलं. यावर देवेंद्र फडणवीसांनी देखील पुढं जाऊन अमित शाह आणि महाराष्ट्राचं कनेक्शन सांगितलं.

नरेंद्र मोदी यांचं सहकारातून समृद्धीचं लक्ष प्राप्त करण्यासाठी अमित शाह यांचा विभाग प्रयत्न करत आहे. अमित शाह गुजरातमधून येतात, पण अधिक प्रेम महाराष्ट्रावर करतात, असं अजित पवार म्हणाले. अजित पवार यांनी हे सांगताच टाळ्यांचा कडकडाट झाला. यावर अजित पवार यांनी कारण सांगितलं, ते म्हणाले अमित शाह महाराष्ट्राचे जावई आहेत. आपण मान्य केलं नाही तर जावयाला सासरच्या लोकांवर जास्त प्रेम असतंच. अमित शाह यांच्या नेतृत्वात वेब पोर्टलचं उद्घाटन हे महत्त्वाचं पाऊल आहे. महाराष्ट्र आणि देशातील सहकारी संस्थांमध्ये उत्साहाचं वातावरण निर्माण होईल, असं अजित पवार म्हणाले.

देशात सर्वाधिक सहकार महाराष्ट्रात ग्रामपातळीपर्यंत पोहोचला. मोठं सहकार क्षेत्र महाराष्ट्रात निर्माण झालं. अमित शाह यांनी सहकार मंत्रालय स्वीकारल्यानंतर नवा कायदा केला. गावपातळीवर सहकाराचं जाळं नेलं पाहिजे यासाठी व्यवस्था निर्माण केली त्यासाठी पोर्टल निर्माण केलं. त्या पोर्टलचं उद्घाटन अमित शाह यांनी महाराष्ट्रात पुण्याची निवड केली, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. अजित पवार म्हणाले की अमित शाहांचं महाराष्ट्रावर प्रेम आहे, ते महाराष्ट्राचे जावई आहेत हे खरं आहे. पण, अमित शाह यांचा जन्म मुंबईत झाला आहे. अमित शाह राजकारणात नव्हते त्यावेळी उद्योग करत होते. त्यांचा उद्योग महाराष्ट्रात होता, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.



### कौशल्य असलेल्याला मिळणार नोकरी

**केंद्र सरकारच्या आणि सहकार खात्याचं नेमकं व्हिजन काय आहे, हे त्यांनी सांगितलं आहे. त्यात सहकार क्षेत्राच्या अनेक निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या मोठ्या समस्यांचं निराकरण झालं. कोणाच्याही नातेवाईकाला नोकरी मिळणार नाही तर फक्त कौशल्य असलेल्या व्यक्तीलाच नोकरी मिळणार असल्याचं ते म्हणाले. को-ऑपरेटिव्ह बँकांना मोठे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे आता या पुढे सहकार क्षेत्राशी संबंधित पारदर्शक होणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.**

### जावयाला सासरच्या लोकांवर जास्त प्रेम - अजित पवार

**नरेंद्र मोदी यांचं सहकारातून समृद्धीचं लक्ष प्राप्त करण्यासाठी अमित शहा यांचा विभाग प्रयत्न करत आहे. अमित शहा गुजरातमधून येतात, पण अधिक प्रेम महाराष्ट्रावर करतात, असे अजित पवार म्हणाले. अजित पवार यांनी हे सांगताच टाळ्यांचा कडकडाट झाला. यावर अजित पवार यांनी कारण सांगितलं, ते म्हणाले अमित शाह महाराष्ट्राचे जावई आहेत. आपण मान्य केलं नाही तर जावयाला सासरच्या लोकांवर जास्त प्रेम असतंच. अमित शाह यांच्या नेतृत्त्वात वेब पोर्टलच उद्घाटन हे महत्त्वाचे पाऊल आहे. महाराष्ट्र आणि देशातील सहकारी संस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होईल, असे अजित पवार म्हणाले.**

### अमित भाईचा तर उद्योग महाराष्ट्रात होता

**महाराष्ट्राची भूमी सहकाराची भूमी आहे. महाराष्ट्रात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. देशात सर्वाधिक सहकार महाराष्ट्रात ग्रामपातळीपर्यंत पोहोचला. मोठं सहकार क्षेत्र महाराष्ट्रात निर्माण झालं. अमित शाह यांनी सहकार मंत्रालय स्वीकारल्यानंतर नवा कायदा केला. गावपातळीवर सहकाराचं जाळं नेलं पाहिजे यासाठी व्यवस्था निर्माण केली त्यासाठी पोर्टल निर्माण केलं आहे. त्या पोर्टलचं उद्घाटन अमित शाह यांनी महाराष्ट्रात पुण्याची निवड केली, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.**



# कालकथित प्रा. सुरेश घायवटसर यांना संदेशभूमीत शोकसभेद्वारे श्रध्दांजली

### संभाजीनगर येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्ह्यातील दलित पुरोगामी चळवळीशी विशेष नाळ जुळलेले महाराष्ट्रातील ख्यातनाम आंबेडकरी कवी, गायक, संगीतकार कालकथीत प्रा. सुरेश घायवट यांना रविवारी धुळ्यातील संदेशभूमी येथे झालेल्या शोकसभेत श्रध्दांजली वाहण्यात आली. घायवटसर यांचे दि.४ ऑगस्ट रोजी रात्री २ वा. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली वाहण्याकरिता धुळे शहरातील संदेश भूमी येथे रविवारी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अनेक मान्यवरांनी घायवटसरांचे दलित, पुरोगामी चळवळ व कला क्षेत्रातील भरीव योगदानाचे दाखले धेत त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. घायवटसरांचे धुळे जिल्ह्यासह खान्देश व अहिराणी भाषेशी फार जिव्हाळ्याचे नाते होते. याविषयी अनेकांनी श्रध्दांजली वाहताना आठवणी सांगितल्या. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य, जेष्ठ पत्रकार चंद्रशेखर पाटील, चित्रपट व नाट्य कलावंत सुभाष शिंदे, संदेश भूमी संरक्षण व संवर्धन कृती समितीचे अध्यक्ष आनंद सैंदाणे, विजय भामरे. इंजिनिअर राजदीप आगळे, बी.टी अहिरे गुरूजी, हर्षबोध मोरे, विजयराव मोरे, बाळासाहेब अहिरे, चंद्रगुप्त खैरणार, नाना साळवे, रविंद्र सुर्यवंशी, अशोक शिरसाठ, सरोजिनी जगताप, नितीन बिह्राडे, मोहन सुर्यवंशी, आनंद शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## गुटखा तस्करी; तिघांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** कारमधून होणारी गुटख्याची तस्करी निजामपूर (ता. साक्री) पोलिसांनी रोखली. ब्राह्मणवेल शिवारात शुक्रवारी (ता. ४) साडेसातच्या सुमारास ही कारवाई केली. याप्रकरणी चालकासह तिघांवर गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी ब्राह्मणवेल शिवारात सापळा लावून कार (एमएच ९४ ईटी ५१५२) अडविली. तिची तपासणी केली असता त्यात विमल पानमसाला आढळला. पाच लाख ३८ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# लाचखोर बहिरम यांना पोलिस कोठडी

**नाशिक । प्रतिनिधी**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शनिवार (दि.०५) रोजी १५ लाख रुपयांची लाच स्वीकारताना नाशिकचे तहसीलदार नरेशकुमार बहिरम यांना रंगेहाथ पकडले होते. त्यानंतर (दि.०६) रोजी त्यांना विशेष न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची म्हणजेच ०८ ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, नरेशकुमार तुकाराम बहिरम (वय ४४, हुद्दा तहसीलदार नाशिक, रा. फ्लॅट नंबर ६०४, बी विंग, मेरिडियन गोल्ड, कर्मयोगी नगर, नाशिक) यांच्या कार्यालयाकडून नाशिक तालुक्यातील राजुर बहुला येथील जमिनी मालकांच्या जमिनीमध्ये मुरुम उत्खननाबाबत मूल्य नियमानुसार पाचपट दंड, स्वामित्वधन जागा भाडे मिळून एकूण रक्कम १ कोटी २५ लाख ०६ हजार २२० रुपयांच्या दंड आकारणीबाबत आदेश देण्यात आले होते. त्या आदेशाविरुद्ध जमिनी मालक यांनी उपविभागीय अधिकारी नाशिक यांच्याकडे अपील दाखल केली होती. निरीक्षण वेळी भेटले असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे १५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. दरम्यान, त्यानंतर बहिरम यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने चौकशी केली असता त्यांनी लाच मागणी केल्याचे मान्य करत लाचेची रक्कम शनिवारी (दि.०५) रोजी स्वीकारल्याचे सांगितले आहे. यानंतर आता लाचखोर बहिरम यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाकडून आणखी सखोल चौकशी करण्यात येणार आहे.

# पांझरा नदी झाली प्रवाही



छाया- दिपक वाघ

**धुळे ।** तालुक्यातील अक्कलपाडा धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याने पांझरा नदी प्रवाहित झालेली आहे. तिसऱ्या दिवशी अक्कलपाडा धरणातून पाणी धुळ्यात दाखल झाले. शहरातही पाण्याची तीव्र टंचाई भासू लागली आहे. पाण्यासाठी काही भागात नागरिकांची भटकंती सुरू आहे. अशा स्थितीत कोरड्या असलेल्या पांझरा नदीपात्रात पाणी आले आहे. नदी वाहते आहे म्हणून काहीजण सायंकाळी नदीलगत फिरायला येऊ लागले आहेत. नदीचा खळखळाट अनेकांना आकर्षिक करू लागला आहे. नदीत पाणी आल्याने, पात्रात गेल्या काही दिवसांपासून साचलेली घाण वाहून गेलेली आहे.नदी कोरडी असतांनाही त्या ठिकाणी असणारया डबक्यातून काहीजण मासे पकडत असतात. आता नदी प्रवाही झाल्याने, नदीपात्रात मासेमारी करण्यासाठी काहीजण सरसावले आहे.

# दिवंगत महानोर, देसाई, सोनाळकर, घायवट, गदर या कलावंतांना नाट्यपरिषदेतर्फे आज नाट्यमंदिरात श्रद्धांजली



**धुळे । प्रतिनिधी**

गत आठवडा हा खूप वाईट ठरला. समाजातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे निधन झाल्याच्या घटना घडल्या. यामुळे समाजाची अपरिमित हानी झाली आहे. कारण समाज घडविण्यात, समाजाला नवा विचार देणाऱ्या काही व्यक्तिरेखा काळाने आपल्यातून हिरावून नेल्या. त्यात दिवंगत रानकवी, पद्मश्री ना. धों. महानोर, चित्रपट कला दिग्दर्शक नितीन देसाई, तेलंगणातील क्रांतिकारी कवी, गायक गुम्मदी विठ्ठल राव उर्फ गदर, प्रा. शेखर सोनाळकर, आंबेडकरी कवी, गायक, संगीतकार कालकथीत प्रा. सुरेश घायवट या दिग्गजांचा समावेश आहे. या सर्व दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आज सोमवार दि ७ जुलै रोजी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज नाट्यमंदिरात शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता ही शोकसभा होणार आहे. या शोकसभेला धुळे शहर व जिल्ह्यातील तमाम राजकीय, सामाजिक, कला, संगीत, शैक्षणिक, सांस्कृतिक व दलित, पुरोगामी चळवळीच्या क्षेत्रातील मान्यवर मंडळी, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य चंद्रशेखर आत्माराम पाटील यांनी केले आहे.

## देवपूर मोहम्मदी नगर येथे बोरवेलचे उद्घाटन

**धुळे । प्रतिनिधी**

शहरासह देवपूर भागात पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली असून, अजहर पठाण (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्याक विभागाचे कार्याध्यक्ष) यांनी इर्शाद जहागीरदार यांच्याकडे मागणी केली होती. अजहर पठाण यांच्या प्रयत्नाने देवपूर मोहम्मदी नगर भागात इर्शाद जहागीरदार यांच्या वतीने बोरवेलचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी त्यांचा सन्मान हाजी मुख्तार पठाण यांच्यावतीने करण्यात आला व माजी नगरसेवक युसूफ खाटीक यांनी त्यांचे आभार देखील मानले. यावेळी माजी नगरसेवक कैलास चौधरी, माजी नगरसेवक युसूफ खाटीक, हाजी मुक्तार खान पठाण, हाजी युसूफ खान, हाजी रफिक पठाण, भिकन शेख, अजहर पठाण, हाजी आसिफ बेग, हाजी शकील शेख, मसूद पठाण, तौसिफ खाटीक, रफिक शेख, साबीर शेख, जाकीर शेख, मुख्तार शेख, आदी उपस्थित होते.

# दिल दोस्ती दुनियादारी : या दोस्तीमध्ये दडलंय काय

मैत्रीचा धागा इतका घट्ट असतो की, दुरावलेला सच्चा मित्रही पुन्हा गवसतो... असेच सध्या घडतेय... दुरावलेल्या मित्रांना पुन्हा शोधण्याचे माध्यम सोशल मीडिया बनले आहे.... सोशल मीडियाद्वारे कित्येकांना त्यांचे जुने मित्र पुन्हा सापडले आहेत. सध्या तरुण असो ज्येष्ठ नागरिक... अनेकांचे दुरावलेले मित्र फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर आणि व्हॉट्स अॅपद्वारे सापडत आहेत. जुन्या मित्रांचे ग्रुपही पुन्हा संपर्कात आले असून, चक्क काहींनी तर व्हॉट्सपवर भन्नाट ग्रुपही तयार केले आहेत. तर काहींचा रोज व्हिडिओ कॉलद्वारे मैत्रीचा कट्टा जमत आहे.

जुलै किंवा ऑगस्टमध्ये काही जणांचं कॉलेज नुकतंच सुरू झालेलं असतं, त्यामुळे नव्या मित्रांना-मैत्रिणींना जाणून घ्यायची ओढ असते. काही जणांसाठी तर हा पूर्ण आठवडाच मैत्रीपूर्ण असा आहे. ग्रुपसोबत गंमतीजमती करण्यासाठी राखून ठेवलेला वेळ फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने उपयोगी येतो. सोशल मीडियाने तरुणांचा आणि ज्येष्ठांचा जुन्या मित्रांशी मैत्रीचा बंध नव्याने जुळवून आणला आहे.आयुष्याच्या पूवार्धात कधी डोकावून बघितलं एक नक्की जाणवेल की परीक्षांमधून मिळालेल्या गुणांमुळे आपल्याला कायमचं सुख मिळतं असं नाही पण लेक्चर बंक करून मित्रांसोबत केलेल्या मस्तीची आठवण आली की नेहमीच आपसूकच डोळ्यांतून आठवणीचे अश्रू ओघळतील. त्यामुळे फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने आपल्याच काही मित्रमैत्रिणींनी त्यांच्या आठवणी, त्यांचे काही किस्से सांगितले आहेत..



**शोध बातमी**

**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

### आठवतो तो बालपणीचा फ्रेंडशिप डे

**मी दहावीत असताना पहिल्यांदा फ्रेंडशिप डे साजरा केला होता. त्या दिवशी खूप पाऊस पडत होता पण तरीही भिजत भिजत मी मैत्रिणीच्या घरी गेले. तिला आश्चर्य वाटलं की ही माझ्यासाठी एवढया पावसात भिजत भिजत आली कशी? माझ्यानंतर अजूनही आमच्या काही मैत्रिणी आल्या. जिच्या घरी गेलो होतो तिच्या आईने आमच्यासाठी छान जेवण बनवलं होतं. असा तो लहानपणी साजरी केलेला पावसाळ्यातला फ्रेंडशिप डे होता.**

**- सोनल चौधरी**



### नाते सगळ्यात खास

**आजकाल निखळ मैत्रीचे उदाहरण सापडणे दुर्मीळ झाले आहे. पण, मैत्रीचे ज्या नाते सगळ्यात खास असते. वेळी तुम्ही काहीही करू शकत नाही, असे जग तुम्हाला सांगते, त्या वेळी तुमच्यातील आत्मविश्वास जागवून उभारी देण्याचे काम मित्र करतात.**

**- प्रशांत चव्हाण**

### अखंड मैत्री

**फ्रेंडशिप डे म्हटलं की मला आठवतं ते आमचं कॉलेज लाईफ. तेव्हा आम्ही असे विविध दिन साजरे करण्यासाठी खूप उत्सुक असायचो. पण जसं कॉलेज संपलं तशी ही सर्व मजा संपली. आता फक्त उरली आहे ती नावापुरती मैत्री. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा आम्ही भेटतो. खरं तर आम्हाला जेव्हा वेळ मिळतो तोच आमचा फ्रेंडशिप डे. पण फ्रेंडशिप डेला मी आवर्जुन सगळ्यांना शुभेच्छा देते. हे नाते असंच दीर्घकाळ अखंडीत राहावं म्हणून प्रयत्न करण्याचं आश्वासन या दिवशी एकमेकांना देतो.**

**- कविता पाटील**

# तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

येथील तरुण शेतकऱ्याची आत्महत्या झाल्याने एकच शोककळा पसरली. पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. हर्षल ज्ञानेश्वर गांगुर्डे (वय २७) असे त्याचे नाव आहे. वाकदर शिवारातील स्वतःच्या शेतात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. घटना उघडकीस येताच गावात सर्वत्र शोककळा पसरली. हर्षलच्या वडिलांना पॅरालिसिसचा झटका येऊन ते उपचार घेत आहेत. हर्षल हा घरात मोठा असल्याने त्याच्यावरच घरची जबाबदारी होती. स्वतःची शेती तो करत होता. त्याने सोयाबीनची पेरणी केली होती. हर्षल हा घराजवळच मित्रांकडे गेला. रात्र होऊनही घरी न आल्याने त्याची शोधाशोध सुरू झाली. सकाळी सातच्या सुमारास हर्षल झाडाला गळफास घेतलेला अवस्थेत एका मजुराला दिसला. मजुराने तत्काळ परिसरातील शेतकऱ्यांना मोबाईल वरून माहिती दिली. पोलीसांना कळविले पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. हर्षलचा मृतदेह ग्रामीण रुग्णालयात दाखल केला. विच्छेदन करून मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन केला. हर्षलने आत्महत्या का केली. याचे कारण समजू शकले नाही. हर्षल हा बाजीराव गांगुर्डे यांचा नातू, तर अरुण गांगुर्डे व शाळीग्राम गांगुर्डे यांचा पुतण्या, ज्ञानेश्वर गांगुर्डे यांचा मुलगा होता. हर्षलच्या आकस्मिक मृत्यूने परिसरात सर्वत्र शोककळा पसरली.



## अचानक संप; हे 'बेस्ट' नव्हे...

देशाची आर्थिक राजधानी असलेले मुंबई शहर हे सतत धावत असते. रेल्वेची लोकल सेवा आणि 'बेस्ट'(इएडढ) ची बससेवा ह्या मुंबईच्या लाईफलाईन मानल्या जातात. तसेच या दोन्ही सेवा सर्वात सुरक्षित आणि स्वस्त म्हणजेच परवडणाऱ्या दरांत प्रवास देणाऱ्या अशा आहेत. मात्र बेस्ट(इएडढ) उपक्रमाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी पगारवाढीसह अन्य विविध मागण्यांसाठी पुकारलेले कामबंद आंदोलन हे सलग तिसऱ्या दिवशी सुरू आहे. विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या या संपामुळे बससेवेवर मोठा परिणाम झाल्याने वाहतूक सेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे मुंबईकरांचे प्रचंड हाल होत आहेत. बेस्टच्या कंत्राटी कामगारांनी पुकारलेल्या या संपाचा फटका बेस्ट परिवहनासह चाकरमान्यांना बसला आहे. कारण सकाळी घराबाहेर पडणाऱ्या मुंबईकरांना कार्यालये किंवा आपापली कामाची ठिकाणे गाठण्यासाठी 'बेस्ट'ची मोठी मदत होते, त्यात बेस्टच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या या संपामुळे चाकरमान्यांचे हाल सुरू झाले आहेत. दररोज हजारोंच्या संख्येने मुंबईकर प्रवासासाठी बेस्टलाच प्राधान्य देतात. अशात अचानकच कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला. या संपात घाटकोपर, विक्रोळी, मुलुंडच्या कंत्राटी कर्मचारी सहभागी झाले आहेत. कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे बेस्ट परिवहनवर मोठा परिणाम झाला असून संपामुळे तीन दिवस नोकरदार मुंबईकरांचे हाल सुरू आहेत.

बेस्टच्या कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित आहेत. त्यात प्रमुख्याने पगारवाढीची मागणी आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांना सध्या १६ हजार रुपये वेतन मिळत आहे. हे वेतन २५ हजार रुपयांपर्यंत वाढवावे, पगारवाढीसोबतच इतरही सुविधा मिळाव्यात, बेस्टचा(इएडढ) अर्थसंकल्प आणि पालिकेचा अर्थसंकल्प दोन्ही एकत्र करण्यात यावेत, खराब बसेस दुरुस्त होईपर्यंत त्या रस्त्यावर आणणे थांबवावे, बंद बसेस पूर्ववत सुरू करण्यात याव्यात अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या मागण्या प्रलंबित असल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन पुकारले आहे. घाटकोपर डेपोमधील साधारण २८० चालक या संपात सहभागी झाले आहेत. बेस्टमध्ये तीन कंत्राटदारांच्या बस सेवा-चालक आहेत. त्यातील एका कंत्राटदाराचा अखत्यारीत असलेल्या वेट लीज कर्मचाऱ्यांनी/चालकांनी हा संप पुकारला आहे. जोपर्यंत मागण्या पूर्ण होणार नाहीत तोपर्यंत संप सुरूच राहील असा पवित्रा कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. बेस्टच्या एकूण २७ पैकी १८ आगारांमध्ये 'काम बंद' आंदोलन सुरू झाले असून १,३७५ बसगाड्या आगारातच उभ्या आहेत. त्यामुळे बस स्थानक, आगारांमध्ये प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसल्या. परिणामी, कार्यालयांमध्ये पोहोचण्यासाठी विलंब होत असल्यामुळे विविध आस्थापनांमधील कर्मचारीही संतप्त झाले आहेत.

मात्र गेल्या काही दिवसांत बेस्ट(इएडढ) बसेसच्या दुर्घटनांमध्ये वाढ झालेली दिसत आहे. बेस्टच्या प्रतिमेला या दुर्घटना गालबोट लावणाऱ्या आहेत हे निश्चित. बस चालविणारे वाहक आणि चालक हेसुद्धा कंत्राटी कामगार आहेत. त्यामुळे दुर्घटनांची संख्या वाढत आहे. मात्र सतत दुर्घटना होत आहेत. पूर्वी वाहतूक अधिकारी हे बसची तपासणी करायचे. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून चालक - वाहकांची आरोग्याची तपासणी व्हायची. आता तसे काहीच होत नाही. त्यामुळे अपघात वाढू लागले आहेत. बसवाहक आणि चालक यांच्यावर बेस्ट प्रशासनाचे नियंत्रण नाही. कंत्राटदारांकडून कोणतीही काळजी घेतली जात नाही. त्यामुळेच अपघात होऊ लागले आहेत. याचाही गांभीर्याने विचार व्हायला हवा. विशेष म्हणजे मुंबईतील बेस्ट प्रशासनाने कॉन्ट्रॅक्टर्सकडून लीजवर बसेस घेतल्या आहेत. त्या कॉन्ट्रॅक्टर्सच्या बसचालकांनी संप पुकारला आहे. आता संपावर जाणाऱ्यांची संख्या वाढत आहे आणि ह्याचा फटका थेट मुंबईकरांना बसत आहे. विशेष म्हणजे कॉन्ट्रॅक्टर्सच्या ह्या बसेस रस्त्यात बंद पडणे, त्यांची देखभाल नीट नसणे ह्या तक्रारी आहेतच.

# मराठी वाङ्मयात मोलाची भर घालणारा ग्रंथ : झाप

प्रा.भगवान पाटील यांचे आत्मकथनपर पुस्तक नुकतेच वाचनात आले.साडेचारशे पानांचा हा ग्रंथ मराठी वाङ्:त्यात मोलाची भर घालणारा आहे.शब्दवैभव प्रकाशन, बुधवार पेठ पुणे यांचे ज्योत्स्ना इंगळे नेरकरयांनी आकर्षक आणि कलात्मक मुखपृष्ठ,हे पुस्तकाचे वैशिष्ट्य असून किंमत रु.पाचशे आहे. प्रा.भगवान राजधर पाटील,हे शिक्षक, साहित्यिक, पत्रकार व कार्यकर्ते अशा विविधांगी भूमिका साकारत जीवनाच्या एका पडावावर येऊन स्थिरावले आहेत.त्यांची ओळख धुळे शहराशी जोडलेली आहे. पण त्यांचे गाव महाळपूर बहादरपूर शिरसोदे या.पारोळा जि.जळगाव हे आहे. त्यांचे वास्तव्य आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांत वेगवेगळ्या ठिकाणी होतं. पण गावाशी त्यांचा संपर्क कधीच तुटला नाही.सध्या ते धुळे शहरात वास्तव्यास असले तरी त्यांचा नित्यनेमाने आपल्या गावाशी संपर्क आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रारंभी डॉ.सजीव गिरासे धुळे व प्रा.प्रा.पी वाया.कुलकर्णी प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड यांच्या पुस्तकाचा परिचय करून देणा-या प्रस्तावना आहेत. त्यात ग्रंथाचे अंतरंग व लेखकाच्या कर्तृत्व संपन्न व्यक्तिमत्वाचा परिचय असे विश्लेषण केले आहे.स्वत: लेखकाने आपल्या मनोगत लिहिले आहे.यातून ग्रंथप्रवेशाबाबत उत्सुकता व कुतूहल जागे होते.

प्रा.भगवान पाटील यांचे हे पहिले पुस्तक नाही. यापूर्वी त्यांनी क्रांतिकारकांचा परिचय करून देणारे सात वेडे वीर हे पुस्तक लिहिले त्याला यदुनाथ थत्ते यांची प्रस्तावना आहे. अमळनेरचे चेतश्री प्रकाशन यांनी ते प्रकाशित केले. खोप्यातील परिस हा त्यांचा कथासंग्रहास प्रा.ग.प्र.प्रधान यांच्या हस्ते प्रकाशित झाला. त्याला प्रा डॉ.श्रुपाल सबनीस यांची प्रस्तावना आहे.आत्मकथनाचा विषय हा गुंतागुंतीचा व अडचणींचा असतो त्यामुळे भली भली माणसे आत्मचरित्र लिहिणे टाळतात.पण प्रा.भगवान पाटील यांनी धैर्य पूर्वक हा विषय हाताळला व आत्मनिवेदनाचा प्रयोग यशस्वीपणे साकारला असं म्हणता येईल.

खान्देशातील शेती संकृती व ग्रामीण जीवन. हे जवळपास सारखेच आहे.निरनिराळ्या जातींशी व व्यवसायातील माणसे खेड्यात राहतात. त्यांचे विचार आहार पध्दत वेशभूषा, आवडीनिवडी यात कमालीचे साम्य असते.सर्वांची बोलीभाषा अहिरानी ही असून सर्वप्रकारच्या लोक व्यवहारात तसेच ,सण,उत्सव कुळाचार ,लग्न समारंभ यात




ही बोली संस्कृतीच्या रुपाने नांदते.प्रा.भगवान पाटील यांनी लोकजीवन अनुभवले व उपभोगले आहे. त्यांच्या प्रतिभेने ते पुस्तक रूपाने मराठी वाचकासमोर ते आता आलेले आहे.

प्रा.भगवान पाटील यांच्या ग्रंथाच्या पूर्वरंगात त्यांची कौटुंबिक परिस्थिती मांडली आहे. त्यांची आजी आणि आई यांच्या माहेरची व सासरची परिस्थिती लेखकाने भावपूर्ण शब्दांत मांडली आहे.ग्रामीण भागात गरिबी व अभाव ही नित्याची बाब आहे.कुणाची पर्वा न करता स्त्री - पुरुष स्वत:: घ्या कामांत गठलेले असतं. इतरांची मजूरीची कामे इमानदारीने करतात.श्रीमंत घराची लेक गरिबाकडे सुखाने नांदण्याचेदृश्य लेखकाच्या कुटुंबात दिसून आले.स्त्रियांमध्ये कमालीची सोशिकता,उमदेपणा व प्रेमभाव असलेल्याचे लेखकाच्या अनुभवात आले.ते त्यांनी प्रांजळपणे वाचकांसमोर मांडले आहे. त्यांनी मांडलेले अनुभव व परिस्थिती आपल्या परिचयाची आहे किंबहुना ते आपली अनुभूती मांडत आहेत असे वाचकाला वाटते. खान्देशात अमळनेरची यात्रा प्रसिद्ध आहे तिला उत्सव म्हणजे उच्छाद म्हणण्याची पद्धत आहे.या यात्रेसाठी जवळच्या अंतरावरील लोक पायी येतात, बैलगाडीसारखी वाटेने पूर्वी स्त्रियांचे यांच्या साठी वापरत. रात्री यात्रेत पोहोचून पाळणे,जादूचे खेळ ,भजन कीर्तन, प्रवचन खआऊखरएदई, संसारोपयोगी वस्तूंची खरेदी यात लोक आनंदाने वेळ दवडतात. हा आनंदाचा उत्सव असतो त्यामुळे , प्रवासाचा शीण जाणवत नाही. हे लेखकाने विस्ताराने मांडले आहे.अमळनेर व तेथून दहा - पंधरा मैलापर्यंतच्या गावातील लोकांची अनुभूती स्वतः घ्या अनुभवातून लेखकाने मांडली आहे.

प्रा.भगवान पाटील यांनी आपले शिक्षण कसे पूर्ण केले हे त्यांनी विस्ताराने मांडले आहे. धुळ्यात राहून विद्यार्थ्यांर्जनाबरोबर मिळविलेले अनुभव व जाणीवांचे संचित त्यांनी वाचकांसोबत वाटून घेतले आहे. ग्रामीण भागातील, शेतकरी वर्गातील मुलांचे विध्यार्जन शहरी मध्यम वर्गाच्या विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे आहे.हे लेखकांनी लक्षात आणून दिले आहे.कमवाआणिशिका असा विचार कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना दिला.धुळ्यात प्राचार्य नानासाहेब वैद्य यांनी विध्यावर्धिनी महाविद्यालयात हे सूत्र अंमलात आणून कितीतरी गरिबविध्यार्थाना शिक्षणापासून वंचित होणा- या धोक्यापासून वाचविले आहे.प्रा.भगवान पाटील यांनी शिक्षणादरम्यान वर्ष भर शेतीकाम केले व शिक्षणात खंड सहन केला.नंतर पुन्हा जोमाने विध्यार्जन सुरू केले.धुळे शहरात आल्यानंतर ही त्यांनी छोटी मोठी कामे व नोकरी करुन शिक्षण पूर्ण केले.व्यक्तिमत्वाच्या घडणीत या घटनाविशेष महत्वराखून आहेत.

प्रा. भगवान पाटील सार्वजनिक जीवनात विद्यार्थी दशेपासून समर्पण आहेत.पण निवडूकांचे राजकारण पासून ते दोन हात दूरच होते. त्यांच्या गावात ग्रामपंचायत निवडणूक झाली त्यात त्यांना भाग घ्यावा लागला तो त्यांनी यशस्वीपणे साध्य केला पण हे राजकारण त्यांना मानवले नाही. पुढे जिल्हा परिषदेसाठी त्यांनी उमेदवारीची तयारी केली व जिंकण्यासाठी व्यूहरचना केली. कॉंग्रेसच्या वतीने उमेदवारी करण्याची त्यांची इच्छा होती पण स्थानिक कॉंग्रेसच्या नेत्यांनी त्यांना ही संधी नाकारली.त्यामुळे ते निराश झाले व उमेदवारी दाखल करण्याचा बेत रद्द केला. पक्षीय राजकारणाला त्यांनी येथेच पूर्ण विराम दिला. लेखक लोकशाही समाजवादी विज्ञान निष्ठा धर्मनिरपेक्ष विचारांचे आहेत.म.गांधी, डॉ राम मनोहर लोहिया,एस.एम जोशी, नानासाहेब गोरे ,प्रा.ग.प्र.प्रधान,भाई वैद्य,यदूनाथ थत्ते,, पन्नालाल सुराणा, या मान्यवरांचा सहवास लाभला त्यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर आहे.हे त्यांनी कोठेही लपवून ठेवले नाही. राष्ट्र सेवा दल व पुरोगामी संघटनांशी त्यांनी आपले नाते जोडलेले आहे. त्यामुळे विचारांची स्पष्टता आणि क्रियाशीलता या वैशिष्ट्यानी त्यांचे व्यक्तिमत्त्व उठून दिसते. प. पू.डॉ.विष्णू महाराज पारनेरकर यांचाही सहवास व वैचारिक जवळकी हे त्यांचे दुसरे वैशिष्ट्य असून त्यांतून सेवाभाव व परमसहिष्णूता त्यांनी अंगी बाणविली आहे.

स्काऊट व गाईड संघटनेत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. बापूसाहेब टी.पी.महाले, टी. एस.बागुल आदींचे सहकारी म्हणून त्यांनी अनेक शिबिरात सहभाग नोंदविला.त्यापैकी खेड तालुका धुळे येथील शिबिराचा अनुभव त्यांनी प्रस्तुत पुस्तकात नोंदविला आहे.या विस्ताराने नोंदविलेल्या अनुभवामुळे स्काऊट गाईड संघटनेची शिस्त व कार्य पध्दतीची वाचकांना माहिती होते. आपल्या शाळेचे नाव गल्ली पासून दिल्ली पर्यंत नेले हे आत्मकथनात आहे. कर्म वीर अण्णासाहेब व्यंकटराव रणधीर यांचा परिचय व सहवास या चळवळीतून त्यांना फावला.ते या चरित्रपर ग्रंथात त्यांनी नमूद केले आहे

झाप या ग्रंथाच्या शेवटच्या भागात त्यांनी काही व्यक्तींचा उल्लेख केला असून त्यांच्या सहवासातील अनुभव नमुद केले आहेत. त्यात प्रामुख्याने प्रा. ग. प्र प्रधान,भाई वैद्य, यदुनाथ थत्ते, पन्नालाल सुराणा, सुधाताई वर्दे, व्यंकटराव रणधीर, टी.पी.महाले, प्रा.अरविंद कपोले,शरद भानगावकर अप्पासाहेब भा.शं.भाल्डे.यांचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. प्रा.प्रधान यांचेविषयी त्यांनी अतीशय आदरपूर्वक लिहिले आहे. कमालीचे निस्पृह व प्रांजळ व्यक्तीमत्व असलेले प्रा.प्रधान सहज सेवादल परिवारात सर्वांना च परिचित आहेत. त्यांच्या आठवणी या पुस्तकात नमूद केल्याने त्यांच्या स्मृतीना उजाळा मिळाला.भाई वैद्य यांच्या आठवणी हृदय स्पर्शी आहेत. प्रा.बापूसाहेब महाले,प्रा.कपोलेसर, बापूसाहेब भानगावकर हे धुळ्याचे रहिवाशी होते. धुळ्यातील कार्यकर्ते सेवा दल सैनिक यांनी त्यांचा दीर्घ काळ सुखद अनुभवला आहे. प्रा.भगवान पाटील यांनी या भावनांना हात घालून त्यांच्याशी भावनात्मक नाते जोडले आहे. झाप हे पुस्तक अनुभवांनी साकारलेले आहे. त्यातून लेखकाचे सर्व पैलू प्रकट झालेले आहेत.शैलीदार लेखन, कसदार प्रतिपादन यामुळे लेखकाचे साहित्यिक गुणविशेष अनुभवास येतात. त्यांचे पुस्तक वाङःमयीन विश्वात विक्रमी यश मिळविल असा अभिप्राय नोंदविणेस हरकत नाही. असंच दीर्घायुष्य लाभावे व साहित्य लिहावे ही शुभेच्छा.

**- बापू ठाकूर, धुळे**

**काही ठिकाणी लोकं एका उच्च दर्जाच्या गुलाबासोबत कमी दर्जाच्या गुलाबाची रोपे लावतात. हे अशा कारणामुळे केलं जातं कि कमी दर्जाच्या गुलाबाचा स्व पारियागीभवन बरोबर होऊ नये. ह्या धारणेला ही रूपरेखा दिली आहे जेणेकरून पारियागीभवन प्रक्रिया उच्चतर दर्जाच्या गुलाबां बरोबर होईल आणि कमी दर्जाच्या गुलाबांचा स्तर वाढू शकेल.**

# विचार पूर्वक मित्र निवडा - संत राजिन्दर सिंह जी महाराज

हा नियम, आपल्या जीवनात पण आपलं मार्गदर्शन करू शकतो. असं म्हटलं जातं कि मनुष्याची ओळख तो कोणाच्या संगतीत राहतो या वरून होत असते . जर आपल्याला धनवान बनायचं आहे तर आपल्याला धनवान लोकांच्या सोबत राहायला पाहिजे. असं करून आपण त्यांच्या सारखा विचार करायला आणि त्यांच्या सारखा कामे करायला लागतो आणि कदाचित आपण पण धनवान होऊ शकतो .

जर आपल्याला धावपटू बनायचं आहे तर आपल्याला धावपटून सोबत राहायला पाहिजे. अशा प्रकारे आपण त्यांच्या सारखे जीवन जगायला प्रेरीत होऊ. आपल्याला दिसून येईल कि त्यानंतर आपण जास्त कसरत करीत आहोत , स्वत:ला बलशाली करत आहोत, आहारावर जास्त लक्ष्य देत आहोत आणि धावायचा सराव करीत आहोत. जर आपल्याला लेखक बनायचं आहे तर आपल्याला लेखकांच्या सोबत राहायला पाहिजे आणि त्या कलेचा अनुकरण करायला प्रेरणा घेतली पाहिजे.



अशा प्रकारे जर आपण आत्मिक विकास करू इच्छितो , तर आपल्याला अश्या लोकांची सोबत करायला हवी ज्यांचा आत्मिक विकास झालेला असेल. अशा लोकांच्या सोबतीत आपण आत्मा-परमात्मा विषयी विचार विमर्श करण्यास अधिक वेळ देऊ, आध्यात्मिक विषयांवर बोलू आणि आध्यात्मिक चिंतन करू. अशा लोकांच्या संगतीत राहिल्याने आपण पण ध्यान साधना करायला लागू. जर आपण सदाचारी जीवन जगणाऱ्या आणि सद्गुणांना महत्व देणाऱ्या सहवासात राहिलो तर आपण देखील तसेच जगायला लागतो.

आपल्याला आपल्या मित्रांवर लक्ष द्यायला हवे. काय आपण असे मित्र निवडले आहेत कि जे स्वतःच्या फायद्यासाठी आपल्याला चुकीच्या मार्गाकडे नेत आहेत? आपण असे मित्र निवडले आहेत जे आपल्याला आध्यात्मिक जीवन जगण्यासाठी मदत करतात? जेव्हा आपल्याला उब हवे असते, तेव्हा आपण आगी जवळ बसतो. जेव्हा आपल्याला गार व्हायचं असतं, तेव्हा आपण बर्फाची लादी जवळ किंवा वातानुकूल (-उ) जागी बसतो. तसेच जर आपण आध्यात्मिक जीवन जगू इच्छितो, तर आपण आध्यात्मिक प्रवृत्तीचे व्यक्ती शोधून , त्यांची सोबत करू शकतो.

जर सौभाग्याने आपल्याला असे सोबती मिळाले कि ज्यांनी आध्यात्मिक अनुभव प्राप्त केलेला आहे तर ती सोबत खूपच चांगली आहे. अश्या व्यक्ती मधून अध्यात्म चारी दिशां मध्ये प्रसारित होते ,जेणेकरून आपले अध्यातम जागृत होऊ शकते. अश्या व्यक्ती जवळ येऊन, आपलं लक्ष्य जीवनाच्या आध्यात्मिक मूल्यांवर जातं . त्या वातावरणाचा सरळ आपल्या आत्म्या बरोबर संपर्क होतो. जो कोणी आपल्या आत्म्याला जाणतो , त्याच्याकडे आपला आत्मा खेचला जातो . त्याची चुंबकीय शक्ती आपल्याला अध्यात्मकडे खेचते आणि आपलं लक्ष्य आंतरिक आध्यात्मिक खजिन्यांकडे टिकून राहात.

जर आपण ध्यान- अभ्यासात सुधार आणू इच्छितो तर आपल्याला विचार करायला हवा कि आपण आपलं वेळ कसा घालवतो. जर आपण आपला वेळ अश्या व्यक्तींबरबर घालवतो जे आध्यात्मिक रूपात जागृत आहेत आणि अध्यत्मा मध्ये रुची ठेवतात, तर आपल्याला दिसून येईल कि आपलं ध्यान अधिक एकाग्र राहतं आणि आपल्याला ध्यान अभ्यासा मध्ये यश मिळते. आपल्या मित्रांची विचारपूर्वक निवड केल्यावर आपल्याला आध्यात्मिक मार्गावर यश मिळण्यास मदत होईल.

## शब्दकोडे-१४२



**आडवे शब्द -** २. शासकीय ५. सम द्रमंथन करणारा नाग ८. मोत्यांचे कर्णभूषण ९. विवाह १०. तसे असो (आशीर्वचन) ११. दुसऱ्यासाठी शब्द टाकणे, भीड १३. एकाग्र नजर १४. चामखीळ १५. विज्ञान १६. शास्त्राचा घाव, आठवड्याचा दिवस १७. सरिता १९. विलंब २०. मित्र २२. प्रभाव २६. अपात्र २९. कंटाळा ३०. कुलू-मनाली या राज्यात आहे ३२. परवानगी, परवानगीने घेतलेली सुट्टी ३४. एक शेंगभाजी ३५. पळवून नेणे ३६. उथळ, अभिरुचीहीन ३८. बक ३९. छत ४०. मेंदूभोवतीचे हाडांचे कवच ४१. सहल, प्रवास ४२. विविध ४४. पुष्ट ४६. प्रसंगावधान ४९. स्वार्थी ५१. संन्याशाची पादत्राणे ५३. वाचक ५४. डझन ५६. मत्सर ५७. ज्वारीचा पदार्थ ५९. पायताण ६०. लाल ६३. हेकट ६४. तुफान ६५. प्रेम असे असते म्हणतात! ६६. गाढव (संस्कृत) ६८. रस्ता ६९. काविळ ७१. गुळाच्या ढेपेला चिकटणारा ७२. लहान मुलीचे कर्णभूषण ७३. पक्का ७४. चिमुकला ७५. बाण ७७. डोशाचा एक प्रकार ७८. अल्पकाळ टिकणारा भाजीपाला इ. ७९. अत्तराचा बोळा

**उभे शब्द -** १. तांबड्या रंगाचे एक रत्न २. सोशिक ३. वाळवंट, युद्धभूमी ४. पद्धतशीर ५. वास्तुच्या रचनेचे प्राचीन तंत्र ६. पोपट ७. बातमी ८. खानदानी ९. कौशल्य १२. डॉक्टरच्या व्यवसायाची जागा १८. केविलवाणा १९. उलगडा २१. आवडता २२. आकाश २३. दर्जाहीन २४. पश्चिम बंगालची राजधानी २५. संशय २७. बडगा २८. नारळाचे कवच ३०. थंडीचा ऋतु ३१. लाज ३३. जागृतावस्था ३४. नभ ३६. कामचुकारांना हा हक्क वाटतो ३७. संकट, विपदा ३८. वितरण ३९. गजानन ४०. शपथ (हिंदी) ४२. नावापुरता, अधिकारहीन ४३. अग्र ४५. ताकीद ४७. थट्टेखोर ४८. नियंत्रण, कबजा ५०. संपत्ती ५१. दुधाचा घट्ट पदार्थ ५२. चुका दाखवून जहाल टीका, कानउघडणी करणे ५५. रात्री न दिसणारा ५६. धर्मेंद्रची पत्नी ५८. लेखणी ५९. खेद वाटावा असे ६१. गाढ झोप ६२. मोह ६५. कर्णाचे राज्य ६७. टोचणी ७०. वासना, इच्छा ७५. शंभर ७६. कृती

## शब्दकोडे १४१ चे उत्तर

**आडवे उत्तर**

८.मास १०. ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा १६.मार १७.बायको १९.वटवट २०.अनवरत २२.मजा २३.कलश २४.चाल २५.गवा २७.तास ३०.गूढ ३१.सफेद ३३.अंगना ३५.बंडलबाज ३८.बाळबोध ४०.वास ४१.साफसफाई ४४.सुर ४६.नथ ४८.रबर ४९.मनकवडा ५१.कलंक ५३.कट्टी ५५.कीव ५७.गवगवा ६०.इजा ६१.वपा ६३.रणरण ६४.नग ६५.श्रीमंत ६६.तरबेज ६८.नट ७०.धबधबा ७१.नीला ७३.कवडीचुंबक ७७.लगबग ७८.पक्षी ८१.भरवसा ८२.रत ८३.सटरफटर

**उभे उत्तर**

१.सोनेरी २.आंजनेय ३.सिनेमा ४.जोर ५.सीमा ६.प्रभू ७.पेला ८.माग ९.सराव ११.परवशता १२.तफावत १३.तृण १४.मीलन १५.सासुरवास १७.बाजारगप्प १८.कोकम २०.अलगूज २१.वग २६.गोंद २८.सबंध २९.हलवा ३२.फेरफार ३४.गळ ३६.बास ३७.सफर ३८.बारव ३९.बोट ४२.सबब ४३.कमकुवत ४४.सुकर ४५.पलंग ४७.थकवा ५०.डाकीण ५२.कवन ५४.आजानुबाहू ५६.वरई ५८.गगनचुंबी ५९.समंध ६२.पारखा ६३.रजनी ६५अ.तबक ६७.अवगत ६९.टब ७२.लाल ७३.कबर ७४.कपट ७५.दंभ ७६.राव ७९.क्षीर ८०.सूट

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय -** फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय -** शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय -** बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

## विजेचा शॉक लागून मायलेकींचा जागीच मृत्यू

नाशिक । येथील दत्तनगरमधील वसाहतीत भाडेकरू म्हणून राहणाऱ्या आई आणि मुलीचा हाय टेन्शन वायरचा शॉक लागून जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवार (दि. ६ ऑगस्ट) रोजी दुपारी दीडच्या सुमारास घडली आहे. बाबत अधिक माहिती अशी की, मीना हनुमंत सोनवणे आणि आकांक्षा राहुल रणशूर असे शॉक लागून मृत्यू झालेल्या मायलेकींची नावे आहेत. घरावरच्या गच्चीतील पेरू तोडत असताना हातातील रॉड हा हाय टेन्शन वायरला लागल्याने मायलेकींचा जागीच मृत्यू झाला. तर मयत आकांक्षा रणशूर हिचे पती राहुल रणशूर व त्यांच्या दोन बालकांना शॉक लागून ते लांब फेकले गेल्याने बालंबाल बचावले. यावेळी राहुल रणशूर यांनी गच्चीवरून आरडाओरड केल्याने कॉलनीतील लोकांनी तात्काळ धाव घेतली. मात्र, गच्चीतील पाण्याची टाकी फुटल्याने विजेचा प्रवाह संपूर्ण बंगल्यात उतरला होता. दरम्यान, सदर घटनेची माहिती मिळताच ओझर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पिंपळगाव येथे पाठवले आहेत.

# सायबर व आर्थिक गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी सदैव सज्ज रहा

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी येथे दीक्षांत संचलन संपन्न

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण प्रबोधिनी ही देशातील उज्ज्वल नावलौकिक असलेली प्रबोधिनी आहे. या प्रबोधिनीत प्रशिक्षण घेऊन देशसेवेत येणाऱ्या पोलीस उप निरीक्षकांसमोर सायबर व आर्थिक स्वरूपाच्या गुन्हेगारीची आव्हाने असल्याने ही गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी सदैव सज्ज रहावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

आज महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीच्या प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरिक्षक सत्र क्रमांक १२२ च्या दीक्षांत संचलन कार्यक्रमाप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, डॉ. राहूल आहेर, राहूल ढिकले, पोलीस महासंचालक रजनिश सेठ, अपर पोलीस महासंचालक राजेश व्हटकर, अर्चना त्यागी, महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीचे संचालक राजेशकुमार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, येणारा काळ आव्हानांचा असून रस्ते गुन्हेगारी सोबतच सायबर व आर्थिक गुन्हेगारीचा सामना करण्यासाठी या प्रशिक्षण प्रबोधिनीतून चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळाले आहे. या प्रबोधिनीतून प्रशिक्षण घेवून बाहेर



पडणारे पोलीस हे देशसेवेत आपले कर्तव्य बजावतांना नेहमीच अग्रस्थानी असतात. आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करून प्रतिष्ठेसोबतच समाजाप्रती निष्ठा बाळगून आपली व देशाची प्रतिमा उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. लोकांच्या सेवेकरीता आपण पोलीस दलात रूजू झालो आहोत, शिस्तीत काम करीत असताना संवेदना जिवंत ठेवल्यास आपण कर्तव्यास निश्चितपणे न्याय देवू शकाल. समाजात गुणवत्तापूर्ण सेवेची संधी आपल्याला मिळाली आहे. या संधीच्या माध्यमातून आपण आपल्या कामाने, जनतेची शाबासकी मिळविणे हेच आपल्या जीवनातील महत्वपूर्ण मेडल असेल, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याप्रमाणे समाजातील चांगल्या प्रवृत्तीचे रक्षण करून वाईट प्रवृत्तींचा बिमोड करणे ही आपली आद्य जबाबदारी आहे. भारतीय संविधानाने आपल्या सर्वांना समान दर्जा दिला असून कर्तव्य पार पाडतांना कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता भारतीय संविधानाची घेतलेली शपथ निभावण्यासाठी कायम प्राधान्य द्यावे. त्यासोबतच आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून सायबर व आर्थिक गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी सज्ज रहावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

पोलीस महासंचालक रजनीश सेठ आपल्या मार्गदर्शनात म्हणाले, प्रशिक्षणार्थी आज आपले प्रशिक्षण पूर्ण करून पोलीस सेवेत रूजू होणार आहेत. समाजातील वंचित व शोषित घटकास समान न्याय व संरक्षण देणे ही आपली महत्वाची जबाबदारी आहे. अवैध वाळू उपसा, अंमली पदार्थ या सारख्या असामाजिक गुन्हेगारीवर आपला अंकुश असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नागरिकांप्रती आपली वर्तणूक सद्भावपूर्ण असावी. गुन्ह्याचा तपास कायद्याला अभिप्रेत असलेल्या प्रक्रियेनुसार होणे अपेक्षित आहे. असे पोलीस महासंचालक यांनी सांगितले.

प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. १२२ (सरळ सेवा) चे प्रशिक्षण सत्र हे १ ऑगस्ट, २०२२ पासुन सुरु झाले. या प्रशिक्षणात महाराष्ट्रातील विविध भागातून निवड झालेल्या ३४९ पुरुष व १४५ महिला प्रशिक्षणार्थीचा समावेश असुन १ प्रशिक्षणार्थी गोवा राज्याचे आहेत. एकुण ४९४ पोलीस उपनिरीक्षक यांनी आपले प्रशिक्षण पूर्ण केले आहे. या प्रशिक्षणार्थी पैकी ८८% प्रशिक्षणार्थी हे पदवीधर व १२% पदव्युत्तर आहेत, यांना सर्व प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. अशी माहिती महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीचे संचालक राजेशकुमार यांनी अहवाल वाचनात दिली.

या कार्यक्रमास विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर पाटील, नाशिक महानगपालिका आयुक्त डॉ. अशोक करंजकर, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलिस अधीक्षक शहाजी उमाप यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थींचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीक्षांत संचलनात उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते गौरविण्यात आलेले कॅडेट...

अभिजीत भरत काळे: यशवंतराव चव्हाण गोल्ड कप - ऑल राऊंड कॅडेट ऑफ द बॅच

रेणुका देवीदास परदेशी : अहिल्याबाई होळकर कप - ऑल राऊंड वूमन कॅडेट ऑफ द बॅच

रुबिया ताजुद्दिन मुलाणी : बेस्ट कॅडेट इन ड्रिल

प्रशांत हिरामण बोरसे : एन.एम. कामठे गोल्ड कप बेस्ट कॅडेट इन राफल अँड रिव्हॉल्वर शूटिंग

अभिजीत भरत काळे : रिव्हॉल्वर ऑफ हॉनर - बेस्ट ट्रेनी ऑफ द बॅच

किरण सुभाष देवरे : डॉ. बी. आर. आंबेडकर कप - बेस्ट कॅडेट इन लॉ

किरण सुभाष देवरे : सिल्व्हर बॅटन - बेस्ट कॅडेट इन स्टडीज

किरण सुभाष देवरे : सेकंड बेस्ट ट्रेनी ऑफ द बॅच

दीक्षांत संचालन समारंभानंतर नूतन शैक्षणिक संकुल, मोटर परिवहन विभाग इमारत, अकॅडमी मुख्य प्रवेशद्वार व संरक्षक भिंत कोनशिलेचे अनावरण आणि भूमिपूजन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, डॉ.राहूल आहेर, राहुल ढिकले, पोलीस महासंचालक रजनिश सेठ, अपर पोलीस महासंचालक राजेश व्हटकर व अर्चना त्यागी, महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीचे संचालक राजेशकुमार यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

असे आहे महाराष्ट्र पोलीस अकॅडमीचे नूतन शैक्षणिक संकुल....

महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई अंतर्गत १३ हजार ८४६ चौरस मीटर जागेत ७९ कोटी ६८ लाख ६१ हजार ९०८ रुपयांचे नवीन शैक्षणिक संकुल व इतर आवश्यक सुविधा उभारण्यात येणार आहेत. यामध्ये एकूण २६ वर्ग खोल्या, १ सायबर लॅब, १ संगणक लॅब, १ स्टाफ रूम, १ कॉन्फरन्स हॉल असणार आहे. तसेच मोटर परिवहन विभाग इमारत, प्रवेशद्वार, टेहाळणी टॉवर, संरक्षक भिंत याप्रमाणे इतर पायाभूत सुविधा या शैक्षणिक संकुलात उपलब्ध होणार आहेत.



## जैन प्राथमिक शाळेत कार्यानुभव व चित्रकला कार्यशाळा उपक्रम

लासलगाव । वार्ताहर

येथील जैन प्राथमिक शिक्षण मंदिर या शाळेमध्ये शनिवार उपक्रम अंतर्गत कार्यानुभव तसेच चित्रकला कार्यशाळा घेण्यात आली.चित्रकला कार्यशाळेत शाळेचे उपशिक्षक विलास पवार तसेच इयत्ता १ ली व २ री च्या वर्गशिक्षकांनी अंकापासून विविध आकार याचे प्रात्यक्षिक दाखविले.कार्यानुभव कार्यशाळेत विविध आकारामध्ये आयमास्क बनवण्याचे प्रात्यक्षिक शाळेच्या उपशिक्षिका पल्लवी दवते तसेच इयत्ता ३री व ४थी च्या वर्गशिक्षकांनी दाखवले.

शाळेच्या मुख्याध्यापिका लिनिता अहिरे यांनी कार्यानुभव तसेच चित्रकला कार्यशाळेसंदर्भात मार्गदर्शन केले.इयत्ता १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांनी चित्रकला कार्यशाळेत तर ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी कार्यानुभव कार्यशाळेत सहभागी होऊन आनंद घेतला.या वेळी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री पवार यांच्या वाढदिवसानिमित्त नाशकात आज नोकरी महोत्सव

नाशिक । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आज होणाऱ्या नोकरी महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून माजी खासदार समीर भुजबळ यांनी या तयारीचा आढावा घेतला आहे. दरम्यान विविध नामांकित कंपन्यांच्या माध्यमातून बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे.

यावेळी शहराध्यक्ष रंजन ठाकरे, कैलास मुदलीयार, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष समाधान जेजुरकर, गौरव गोवर्धने, संजय खैरनार, योगेश निसाळ, आकाश पगार, चेतन कासव, आकाश कदम, चिन्मय गाढे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नाशिक जिल्ह्यातील बेरोजगारांना सुवर्ण संधी उपलब्ध करून देण्यासाठी नाशिक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने पुढाकार घेत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य नोकरी महोत्सव आयोजित केला आहे. यामध्ये विविध नामवंत कंपन्या, उद्योग, कॉर्पोरेट, फायनान्स, सेवा या क्षेत्रातील जवळपास ५० पेक्षा अधिक कंपन्या सहभागी होणार असून नोकऱ्यांसाठी कंपन्यांकडून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतल्या जाणार आहे. महोत्सवात दहावी, बारावी, पदवीधर, आयटीआय, पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग पदवी यासह सर्वच विभागातील पात्रताधारक उमेदवारांसाठी

## चिमुकल्यांनी वृक्षाला बँड बांधून साजरा केला फ्रेंडशिप डे

नाशिक । प्रतिनिधी

जागतिक फ्रेंडशिप डे हा बालकांपासून ते वृद्धांपर्यंत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यातून मैत्रिविषयी, परस्परांविषयी मैत्र भाव स्नेह,प्रेम व्यक्त केले जाते. मैत्रीदिनाचे हे औचित्य निमित्त पंचवटी परिसरातील सरस्वती नगर येथील चिमुकल्यानी फ्रेंडशिप डे अनोख्या पद्धतीने साजरा केला. आपल्या परिसरातील वृक्षांना फ्रेंडशिप बँड बांधले, झाडांना आळे करून, झडांभवतीचा काडी कचरा साफ केला.

वृक्ष आपले सच्चे मित्र आहेत,आपल्याकडून कुठलीच अपेक्षा न ठेवता आपल्याला मुबलक ऑक्सिजन देतात, फळे, फुले, सावली देतात. पर्यावरणाचे



संतुलन करतात, जमिनीची धूप थांबवतात, मानव, पशू पक्षी, जीव जंतू, किटके ह्या सर्वांना जगण्यासाठी मदत करतात. म्हणून वृक्ष आपले खरे मित्र आहेत. अशी ह्या चिमुकल्यांची या वेळी भावना झाली. दिविजा ढगे, अन्वी पाबळे, शर्वरी पाबळे, अनिषा फडतरे, आर्नव खांबेकर, सोजस उन्हाळे, या चिमुकल्यांनी वृक्षाला फ्रेंडशिप बँड बांधला. वृक्षा विषयी मैत्रभाव व्यक्त केला.निसर्ग शाळेचे अण्णासाहेब जगताप, प्रा डॉ ज्ञानोबा ढगे आदींचे मार्गदर्शन लाभले.

## महाराष्ट्र नाभिक महामंडळ दिंडोरी लोकसभा सरचिटणीस पदी सचिन सोनवणे यांची निवड

नाशिक । वार्ताहर

महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक लासलगाव येथे आयोजित करण्यात आली होती.येवला येथील राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे शहर प्रमुख सचिन सोनवणे यांची महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या नाशिक जिल्हा सरचिटणीस पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे .

महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रांताध्यक्ष दत्ता अनारसे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रांत उपाध्यक्ष अशोक सूर्यवंशी,निमंत्रित सदस्य नारायणराव यादव,अरविंद देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत लासलगाव येथील श्री विठ्ठल रुक्मिणी व श्री संत सेना महाराज मंदिर या ठिकाणी बैठक संपन्न झाली.

नवनिर्वाचित जिल्हा सरचिटणीस सचिन सोनवणे यांनी मनोगत व्यक्त करताना महामंडळाचा नावलौकिक व तरुणांना एकत्र घेऊन बरोबर काम करण्याचे आश्वासन दिले.यावेळी सोनवणे यांचा सन्मानपूर्वक नियुक्तीपत्र देण्यात आले.

## श्री महावीर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतला प्रत्यक्ष मतदानाचा अनुभव

नाशिक । वार्ताहर

भारतीय लोकशाहीतील प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया कशी असते याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी श्री महावीर विद्यालयात प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली.श्री महावीर विद्यालयात सन २०२३ -२०२४ या वर्षाकरिता शालेय विद्यार्थी संसद स्थापना करण्यासाठी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली.यासाठी सर्वप्रथम निवडणूक कार्यक्रम जाहीर




करण्यात आला. यात अर्ज वाटप, अर्ज भरणे, अर्जाची छाननी व चिन्ह वाटप, प्रचार, प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी यांचा समावेश होता.

प्रचारासाठी विद्यार्थी उमेदवारांना ३ दिवसाचा कालावधी देण्यात आला. आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन केले गेले व चौथ्या दिवशी गुप्त मतदान पद्धतीने शालेय विद्यार्थी संसदेसाठी मतदान घेण्यात आले. यात इ. ५ वी ते १० वी तील एकूण ८०० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदानाचा अनुभव घेतला. त्यानंतर मतमोजणी करून शालेय विद्यार्थी संसद जाहीर करण्यात आली. यात शालेय पंतप्रधानपदी जागृती पाटील व आयुष जाधव, शिस्तमंत्री पदी पल्लवी कांगणे व गौरव सोनवणे, क्रीडामंत्री पदी कल्याणी पुरकर व निलेश पाटील, वनमंत्री पदी हर्षदा भागवत व प्रदीप माने, स्वच्छता मंत्री पदी पायल चव्हाण व श्लोक कर्डिले, अभ्यासमंत्री पदी नम्रता कवडे व राजवीर नवले यांची निवड झाली.

या उपक्रमाचे नियोजन विद्यालयाचे उपशिक्षक सचिन आहेर,सचिन मुंगसे,प्रवीण कहाणे यांनी केले.शालेय विद्यार्थी संसद मध्ये निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्था चालक तसेच प्राचार्या पल्लवी चव्हाणके,पर्यवेक्षक शिवाजी धुमाळ यांनी हार्दिक अभिनंदन केले.

## लासलगाव महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाचे उद्घाटन

लासलगाव । प्रतिनिधी

येथील नूतन विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर चा उद्घाटन सोहळा महाविद्यालयाचा कॉन्फरन्स हॉल मध्ये शनिवार पार पडला.या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे यांच्या हस्ते आज करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.भूषण हिरे होते.तसेच कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नासिक जिल्ह्याचे राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर चे समन्वयक राजेंद्र धनवटे,उपप्राचार्य डॉ. सोमनाथ आरोटे यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती,स्वामी विवेकानंद,श्री संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस



पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या वेळी रा.से.यो. स्वयंसेविकांनी स्वागत गीत म्हणून सर्व अतिथींचे स्वागत केले.रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी देवेंद्र भांडे यांनी प्रास्ताविकातून रा.से.यो. ची भूमिका विषद केली.कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून संस्कारी युवक घडत असल्याचे नमूद केले तसेच समाजसेवेचे हे व्रत अंगीकारून युवक राष्ट्रसेवेच्या कामी येऊ शकतो असे प्रतिपादन यावेळी केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले श्री राजेंद्र धनवटे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास मांडला आणि आपत्ती,पूर परिस्थिती असेल तर या परिस्थितीत राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक कशा पद्धतीने देशकामी येऊ शकतो हे स्वयंसेवकांना सांगितले.महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सोमनाथ आरोटे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य प्रा. भूषण हिरे यांनी सांगितले की राष्ट्रीय सेवा योजनेचे हे व्रत स्वयंसेवकांनी अंगीकारले तर आपण देखील देशसेवेच्या कामी येऊ शकतो.

या कार्यक्रमासाठी श्री.किशोर गोसावी,वरिष्ठ महाविद्यालयाचे रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप सोनवणे, डॉ.संजय शिंदे, रा से.यो. (+२ स्तर) कार्यक्रम अधिकारी देवेंद्र भांडे, सुनिल गायकर, गणेश जाधव, दत्तात्रय गायकवाड, महेश होळकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल गायकर यांनी केले तर आभार गणेश जाधव यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री.गोविंदराव होळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे आणि उपप्राचार्य यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांच्यासह सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## प्राचार्य डॉ.आर.डी.दरेकर यांना एज्युकेशन लिडरशीप अवॉर्ड



नाशिक । प्रतिनिधी

केटीएचएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर यांना नाशिक एज्युकेशन लिडरशीप अवॉर्ड मिळाल्याबद्दल मविप्र संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, डॉ. नितीन जाधव, प्रा. बी. डी. पाटील, डॉ. अजित मोरे उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**शिरपूर ।** तालुक्यातील भोररखेडा येथे आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन पर्यवेक्षक सी.जी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पर्यवेक्षक सी.जी.पाटील यांनी लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले. परीक्षक म्हणून चंदन पावरा व मीना पाटील यांनी काम पाहिले. आभार जे. डी. पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी चव्हाण एन. डी., डी. आर. राजपूत, आर. जी. पाटील, एन. वाय. बोरसे, एस. आर. देसले, एस. एम. पाटील, वाल्मिक डी. पाटील, व्ही. एस. ईशी, पी.टी. चौधरी, सुनील पावरा, श्रीमती तिरमले, पी. एस. परदेशी, आफ्रिद पटेल, मोराणकर मॅडम, कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# जापी साठवण बंधारा दुरुस्तीस प्रारंभ एकूण १६ लक्ष रु. निधी मंजुर

### आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने पांझरा नदीवरील धुळे तालुक्यातील जापी-शिरडाणे शिवारातील साठवण बंधारा जापी क्र.२च्या दुरुस्ती कामास प्रारंभ झाला आहे. या कामासाठी आ.पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात एकूण १६ लक्ष २७ हजार रुपयाचा निधी मंजुर करुन आणला आहे.बंधार्याच्या दुरुस्तीमुळे परिसरातील शेतीच्या सिंचन क्षमतेत वाढ होवून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, धुळे तालुक्यातील पांझरा नदीवर जापी-शिरडाणे शिवारात साठवण बंधारा जापी क्र.२चे बांधकाम करण्यात आले होते. या बंधर्याच्या पाट्या जीर्ण झाल्यामुळे त्या बदलून नवीन टाकणे गरजेचे होते. तसेच पांझरेला येणार्या महापूरामुळे बंधार्याचा माती भराव वाहून गेला होता. त्यामुळे या बंधार्याचे पाणी वाहून जात होते तर साठवण क्षमताही कमी झाली होती. परिणामी या परिसरातील शेतकर्यांच्या शेतीचे सिंचनाचे प्रमाण कमी होवून बागायत शेतीला फटका बसत होता. सदर बंधार्याची दुरुस्ती व्हावी म्हणून जापी,शिरडाणे येथील शेतकरी व काँग्रेस पदाधिकार्यांनी आ.कुणाल पाटील यांच्याकडे बंधारा दुरुस्तीची मागणी केली होती. त्यानुसार आ.कुणाल पाटील यांनी संबधित विभागाच्या अधिकार्यांची बैठक घेवून बंधारा दुरुस्तीसाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या होत्या. सदर प्रस्तावाच्या मंजुरीसाठी पाठपुरावा करुन दुरुस्तीसाठी आ.कुणाल पाटील यांनी एकूण १६ लक्ष २७ हजार रुपयाचा निधी मंजुर करुन आणला आहे. त्यामुळे या बंधार्याच्या दुरुस्तीच्या कामास नुकतीच सुरुवात झाली आहे. मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने मुख्यमंत्री जलसंर्वन योजनेंतर्गत सदर बंधार्यांच्या दुरुस्ती कामास मंजुरी मिळाली होती. बंधार्याच्या दुरुस्तीमुळे शेतीच्या सिंचनात वाढ होणार असून बंधार्याजवळ असलेल्या विविध गावांच्या पाणी पुरवठा योजनांच्या जलस्त्रोतात वाढ होवून पाणी टंचाई दूर होणार आहे. त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.



## जुने आमदार निवासाच्या जागेवर व्यापारी गाळे-भाजी मंडई उभारा

**शिंदखेडा । प्रतिनिधी**

येथे नुकतेच भाजी मंडई ओटे व व्यापारी गाळे लिलाव पार पडला त्यात सर्व भाजी विक्रेत्यांना ओटे व गाळे मिळू शकले नाहीत. त्या अनुषंगाने नगर पंचायत प्रशासनास माजी नगराध्यक्षा रजनी वानखेडे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की,सदर लिलावात काही भाजी विक्रेते व व्यापारी वर्ग हे ओटे व व्यापारी गाळे पासून वंचित राहिले आहेत. त्यांच्या साठी त्या लगतच असलेले जुने आमदार निवास जे नगर पंचायत मालकीचे आहे. त्या ठिकाणी नवीन भाजी मंडई ओटे व व्यापारी गाळे उभारण्यात यावे. जेणे करून वंचित राहिलेले भाजी व फळ विक्रेते तसेच बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. या आशयाचे निवेदन नगरपंचायत चे मुख्याधिकारी व प्रशासक प्रशांत बिडगर यांना देण्यात आले. यावेळी माजी उपनगराध्यक्ष प्रकाश देसले, माजी नगरसेवक उल्हासराव देशमुख, माजी नगरसेवक विनोद पाटील, माजी उपनगराध्यक्ष भिला माळी, भाजपा शहराध्यक्ष प्रवीण माळी, अर्जुन सोनवणे, भूपेंद्र राजपूत उपस्थित होते.

# पालकमंत्री रस्त्यावर मनपा ताळ्यावर

### महिनाभरात नाशिक शहरातील रस्ते सुस्थितीमध्ये आणणार- ना. दादाजी भुसे

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक शहरात एकुण २३०० किलोमीटरचे रस्ते असून त्यातील १६२२ किलोमीटरचे रस्ते हे डांबरी आहेत. तर २५४ किलोमीटरचे रस्ते हे खडीचे आहेत. त्याचबरोबर २८९ रस्ते कॉन्क्रिटचे तर १२८ रस्ते झोपडपट्टी भागातील आहे. १६२२ डांबरी रस्त्यांपैकी बहुतांश रस्ते हे महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीने चुकीच्या पद्धतीने रस्ते खोदकाम केल्यामुळे उखडले आहेत. पावसाळ्यामुळे अधिकच खराब झालेल्या या रस्त्यांवरील खाड्यांमधून नाशिकरांना प्रवास करावा लागत असल्यामुळे नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी नाशिक शहरात विविध ठिकाणी रस्त्यांचा पाहणी दौरा करून तत्काळ रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे मनपा आयुक्तांना आदेश दिले आहेत. याप्रसंगी सह संपर्क प्रमुख राजू लवटे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, मनपा आयुक्त डॉ. अशोक करंजकर उपस्थित होते. दरम्यान पालकमंत्री भुसे यांनी पाहणी दौरा सुरू करण्यापूर्वीच त्या ठिकाणी मनपातर्फे युद्ध पातळीवर खड्डे बुजवण्याचे काम सुरू असल्याचे दिसून आले. म्हणजे पालकमंत्री हे जेंव्हा रस्त्यावर उतरले त्यावेळी नाशिक मनपा जागृत होत ताळ्यावर आली असल्याचे दिसून आले.

शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी महापालिका आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर त्याची गंभीर दखल घेत या कंपनीने रस्ते खोदकामासाठी डॅमेज चार्जेस पोटी भरलेल्या रकमेतून तातडीने रस्ते दुरुस्तीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. बांधकाम विभागाने स्थायी समितीवर १०४ कोटी रुपये खर्चून शहरातील रस्ते सुस्थितीत आणण्यासाठी प्रस्ताव ठेवला असून साधारण पुढील पंधरा दिवसांमध्ये खड्डे भरून रस्ते सुस्थितीमध्ये आणण्यासाठी महापालिका कामकाज सुरू करेल असे आश्वासन मनपा आयुक्त यांनी दिले.

याप्रसंगी उप जिल्हाप्रमुख शामकुमार साबळे, योगेश बेलदार, योगेश चव्हाणके, प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, महेश जोशी, विधानसभा प्रमुख बाबुराव आढाव, रोशन शिंदे, हरीश भडांगे, सुवर्णा मटाले, जयश्री खर्जुल, अंबादास जाधव, दिगंबर नाडे, किरण फडोळ, शुभम पाटील, सुधाकर जाधव, आनंद फरताळे, शिवा टाकटे, विक्रम कदम, उमेश चव्हाण, कल्पेश कांडेकर, पिंटू शिंदे, विशाल खैरनार, भिवानंद काळे, सनी रोकडे, दिलीप अहिरे, आकाश पवार, मनपा अधिकारी उपस्थित होते.

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षपदी प्रेरणा बलकवडे

**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षपदी प्रेरणा बलकवडे यांची फेरनिवड करण्यात आली. काल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी विधानपरिषदेचे माजी सभापती रामराजे निंबाळकर, माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार शिवराम झोले, प्रदेश पदाधिकारी दिलीप खैरे, महाराष्ट्र प्रदेश सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब कर्डक, जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार, नाशिक शहराध्यक्ष रंजन ठाकरे, विष्णूपंत म्हैसधुणे, गोरख बोडके, निवृत्ती अरिंगळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# राहूल गांधींच्या शिक्षेला स्थगिती काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा जल्लोष

**धुळे । प्रतिनिधी**




देशाचे नेते काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहूल गांधी यांना सुनावण्यात आलेल्या दोन वर्षाच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने धुळे जिल्हा शहर काँग्रेसच्यावतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवून काँग्रेस विजयाच्या घोषणा दिल्या.

गुजरात न्यायालयाने खा.राहूल गांधी यांना दोन वर्षाची शिक्षा सुनावली होती. मात्र या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी स्थगिती दिली. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दोन वर्षाच्या शिक्षेला स्थगिती मिळाल्याने राहूल गांधी यांना पुन्हा खासदारकी बहाल केली जाणार आहे. शिक्षेला स्थगिती मिळाल्याने महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली धुळ्यातील काँग्रेस भवनासमोर काँग्रेस कार्यकर्त्यांनी व पदाधिकार्यांनी पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी धुळे शहर काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.अनिल भामरे, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे, कृऊबाचे माजी सभापती गुलाबराव कोतेकर, ज्येष्ठ नेते रमेश श्रीखंडे, काँग्रेस महिला अध्यक्षा गायत्री जयस्वाल, ज्येष्ठ नेते पितांबर महाले, जि.प.सदस्य अरुण पाटील,किरण नगराळे, संचालक बापू खैरनार, राजेंद्र खैरनार,रविंद्र पाटील, वाल्मिक वाघ,दिपक पाटील, हरभाऊ अजळकर, कन्हैयालाल भदाणे, ज्येष्ठ नेते महेश घुगे, दिपक कोतेकर, भिवसन अहिरे, मछिंद्र अहिरे, फक्रुद्दिन लोहार, बानुबाई शिरसाठ,यामिनी खैरनार, इम्तियाज पठाण, इन्दीयास अन्सारी, जाफर मुस्तुक, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष नाविद शेख आदी कार्यकर्ते आनंदोत्सवात सहभागी झाले होते.

## वाहन चालकांसाठी परिवहन विभागातर्फे नेत्र तपासणी

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील मुंबई - आग्रारोडवरील स्वयंवर लॉन्स येथे प्रवाशांच्या सुरक्षितेसाठी जिल्ह्यातील सर्व खाजगी बस मालक, चालक, वाहक यांच्यासाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.२०० ते ३०० चालकांनी नेत्र तपासणी शिबिरात सहभागी झाले होते. या शिबिराचे उदघाटन अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकान यांच्या हस्ते झाले.यावेळी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी चारुदत्त व्यवहारे,प्रादेशिक परिवहन अधिकारी डॉ. स्टीवन अलवारीस, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल कदम, मोटार वाहन निरीक्षक फारुक शेख, प्रसाद रायते, ललीत जाधव, प्रविण महाले (मोटार वाहन निरीक्षक) जी. यु बिन्हाडे, राजेश संभाजी चौधरी, प्रविण महाले, नेत्र तपासणी अधिकारी डॉ. प्रसाद रायते,डॉ ललित जाधव,डॉ. जी. यु. बिहाडे याच्यांसह चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिहंस्थ कुंभमेळाच्या पूर्व तयारीसाठी मनपा मुख्यलयात बैठक

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथे २०२७-२८ मध्ये सिहंस्थ कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्त तथा प्रशासक अशोक करंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली सिहंस्थ कुंभमेळाच्या पूर्व तयारीसाठी मनपा मुख्यलयात अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. नाशिकमध्ये बारा वर्षांतून एकदा भव्य स्वरूपात सिहंस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होते. या काळात शाही मिरवणूक व शाही स्नानाच्या पर्वणी असतात म्हणून संपूर्ण भारतभरातून व परदेशातून लाखो भाविक नाशिकमध्ये येत असतात. त्यामुळे भाविकांच्या सोयीसुविधांसाठी प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात नियोजन केले जाते. यामुळे नाशिकमध्ये अनेक पायाभूत सुविधा उभारल्या जातात. नाशिक शहरात गोदावरी नदीवर झालेले पूल,रस्त्याचे रुंदीकरण, विविध प्रकल्प याबाबी प्रामुख्याने सिहंस्थ कुंभमेळ्यामुळे यापूर्वी झाल्या आहेत.

घाट विकास, गोदावरी प्रदूषण मुक्त, मलनिस्सारण केंद्राचे सक्षमीकरण केले जाणार आहे. तसेच येत्या काही दिवसांत नाशिक मनपाच्या सर्व विभागाने आपल्या विभागाचा सिंहस्थ आराखडा सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहे. तो एकत्रित करून महाराष्ट्र शासनास मंजुरीसाठी पाठविला जाणार आहे. बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त विजयकुमार मुंडे, कार्यकारी अभियंता नगरनियोजन संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा रवींद्र धारणकर, मिळकत व्यवस्थापक जयवंत राऊत, आरोग्य वैद्यकीय अधिकारी नितीन रावते, घनकचरा व्यवस्थापक डॉ.कल्पना कुटे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, कार्यकारी अभियंता बाजीराव माळी, शिक्षणाधिकारी बी.टी. पाटील आदी उपस्थित होते.

# प्राचार्य ईश्वर बडगुजर यांचा सेवापूर्ती सोहळा

### आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते हृद्य सत्कार

**धुळे । प्रतिनिधी**



मुकटी ता.धुळे येथील श्री शिवाजी हायस्कूलचे प्राचार्य ईश्वर बडगुजर हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते त्यांचा भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्ती म्हणजे सामाजिक कार्याची उत्तम संधी असते. आणि प्राचार्य ईश्वर बडगुजर सेवेत असतांनाही सामाजिक कार्य करीत होते आता त्यांचा सामाजिक कार्याचा वेग निश्चितच वाढेल यात शंका नाही. असे प्रतिपादन आ.पाटील यांनी यावेळी केले.

श्री शिवाजी हायस्कूल व जिभाऊसो. पोपटराव गोविंदराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय मुकटी ता.धुळे येथील प्राचार्य ईश्वर बडगुजर हे नुकतेच आपल्या प्रदिर्घ सेवेतून निवृत्त झाले आहेत. त्याअनुषंगाने मुकटी येथे सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ.राजवर्धन कदमबांडे हे होते. याप्रसंगी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, प्राचार्य ईश्वर बडगुजर यांनी संघर्षमय जीवनातून जवाहर सुतगिरणीचे कामगारपासून तर प्राचार्य पदापर्यंतचा प्रवास खरोखरच अभिमानास्पद आहे. आपली सेवा सांभाळत असतांना ते नेहमीच पत्रकारीता आणि सामाजिक कार्यात कार्यरत असतात. मात्र सेवानिवृत्तीनंतर प्रत्येकाला सामाजिक कार्यात उज्वल कार्य करण्याची संधी मिळत असते. आजच्या तरुणांनी प्राचार्य ईश्वर बडगुजर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या जीवनाची वाटचाल करावी. प्राचार्य ईश्वर बडगुजर यांनी सामाजिक कार्याबरोबरच धुळे तालुक्यातील ग्रामीण पत्रकार सृष्टीत मोलाचे योगदान दिले आहे. प्राचार्य बडगुजर यांनी शाळेसाठी मनापासून काम केले, यापुढेही त्यांचे शाळेशी ऋणानुबंध काय राहतील असे प्रतिपादन आ.कुणाल पाटील यांनी यावेळी केले. त्याचा अभिमान सामाजाने बाळगला पाहिजे असे ज्येष्ठ नेते सुधाकर बडगुजर यांनी शेवटी सांगितले. कार्यक्रमात प्राचार्य ईश्वर बडगुजर यांनी मनोगत व्यक्त केले. सेवापूर्ती सोहळ्याला आ.कुणाल पाटील, माजी आ.राजवर्धन कदमबांडे, नाशिक जिल्हा शिवसेना(उबाठा)प्रमुख सुधाकर बडगुजर,बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, संस्थेचे चेअरमन गुलाबराव पाटील, माजी पं.स.पंढरीनाथ पाटील, बाजार समितीचे संचालक विशाल पाटील, डॉ.संदिप पाटील, ज्येष्ठ पत्रकार रमेश दाणे, हेमंतभाऊ मदाणे, सचिव नगराज पाटील, पं.स.सदस्य सुरेखाताई बडगुजर, प.स.सदस्य राजेंद्र शर्मा, छोटूभाऊ चौधरी, जि.प.सदस्या सौ.मिनलताई पाटील, पोलिस उपअधिक्षक अनिल बडगुजर, शिक्षण विस्तार अधिकारी महेश घुगे, ज्येष्ठ नेते उमेश करोडपती, नानाभाऊ देवरे, माजी सरपंच उमाकांत पाटील, युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष हर्षल साळुंके, रोहिदास हाके आदी उपस्थित होते

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577



# स्वराज्यतर्फे महिलांना नॅपकीन बुके, राखी मेकिंग, पेपर बॅग, फॅशन डिझाईनचे प्रशिक्षण


















नाशिक ।
स्वराज्य प्रमुख संभाजी महाराज स्वराज्य संपर्कप्रमुख तथा प्रवक्ते करण गायकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उत्तर महाराष्ट्र महिला आघाडी अध्यक्ष मनोरमा पाटील व महाराष्ट्र कोर कमिटी सदस्य पुष्पा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजी महाराज यांनी दिलेल्या आदेशाने स्वराज्याचा प्रत्येक पदाधिकारी हा सक्षम व्हावा यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले.या माध्यमातून नाशिक जिल्ह्यामध्ये महिलांसाठी मोठ्या प्रमाणात मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन वेगवेगळ्या ठिकाणी केले जात आहे. यामध्ये महिलाही मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन या प्रशिक्षणाचा फायदा घेत आहेत. यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी राखी मेकिंग, पेपर बॅग, फॅशन डिझाईन, नॅपकिन बुकेचे प्रशिक्षण देण्यात आले. उद्योजक आघाडी महानगरप्रमुख मीनाक्षी पाटील व नाशिक महानगरप्रमुख निशिगंधा पाटील यांनी प्रशिक्षण दिले. ज्या महिला राख्या बनवणार आहेत त्या राख्यांसाठी स्वराज्य पक्षाच्या वतीने काही महिलांना स्टॉल उभे करण्यासाठी मदत केली जाणार आहे. या वेगवेगळ्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून जास्तीत-जास्त महिलांनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहनही स्वराज्य पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. माडसांगवी, दिंडोरी, जेलरोड, नाशिकरोड, जत्रा हॉटेल, आडगाव या ठिकाणी विविध प्रकारच्या घेतलेल्या प्रशिक्षणाला या विभागातील महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. या प्रशिक्षणाचे आयोजन महिला आघाडी जिल्हाप्रमुख सुलक्षणा गवळी, जिल्हा संपर्कप्रमुख रेखा काजल देवरे, श्वेता गुंजाळ त्यांनी केले होते.



# कमलाबाई कन्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी वन्यजीवांबद्दल जनजागृती कार्यक्रम











धुळे । शहरातील कमलाबाई कन्या शाळेत आदर्श सर्पमित्र ग्रुप चे अध्यक्ष दत्तात्रय मोरे व संतोष गुप्ता यांनी सर्प या वन्य जीव बद्दल सामान्य माणसात असलेली सर्प बाबतची भीती व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी प्रोबोधन कार्यक्रम घेतला. यावेळी कमलाबाई शाळेचे सचिव नाईक, शाळेच्या उपमुख्यध्यापिका व आदर्श सर्पमित्र ग्रुप चे सदस्य उपस्थित होते .या कार्यक्रमात बिनविषारी, सौम्यविषारी तसेच विषारी सापांचे फोटो प्रेम दाखवून सर्प ची रंग संगती ,खाद्य, वास्तव्य  तसेच विषारी सर्प चावल्यानंतर दिसून येणारी लक्षण व त्यावर प्रथमोपचार या बाबत सविस्तर माहिती दिली.  पावसाळ्यात सापांची बिळे पाण्याने भरल्याने साप बाहेर येतात. खेड्यापाड्यात मुलांना लहान वयापासून आयुष्यात कधी ना कधी सापांना सामोरे जावे लागते. अनेक प्रकारच्या गैरसमजुतीतून आणि अंधश्रद्धेतून सापांची हत्या केली जाते. निसर्ग साखळीतील उपयोगी, समस्त मानव जातीस व शेतकऱ्यांस उपयुक्त अशा प्राण्यांविषयी योग्य माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. गावांमध्ये साप दिसला की त्याला मारून टाकले जाते. प्रत्यक्षात फार कमी साप विषारी आहेत. मात्र लोक घाबरून सापांना मारतात, त्यामुळे सापांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. प्रत्येक साप विषारी नसतो. विषारी साप कसा ओळखायचा, सापांचे प्रकार, सर्पांच्या विविध प्रजाती, साप चावल्यावर प्रथोमचार कसे करावे, साप समोर दिसला, तर काय करावे, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सापांना मारू नका, असे आवाहन करतानाच जखमी पक्षी प्राणी दिसल्यास त्यांच्यावर उपचार करून त्यांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले.

संकलन : दिपक वाघ